





# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १८५ । शुक्रवार १० एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## शिंदे सेनेच्या माजी नगरसेवकाकडून नगर शहरातील व्यापाऱ्याला जबर मारहाण

### अतिक्रमित जागेवरील गाळे काढण्यासाठी अर्ज दिल्याचे कारण पिता-पुत्राच्या दादागिरीने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव मधील शिंदे सेनेच्या माजी नगरसेवकासह त्याच्या मुलाने नगर शहरातील कापड व्यापाऱ्याला बेदम मारहाण केल्याची घटना रविवार, दिनांक ५ रात्री नऊच्या सुमारास घडली. या नारणीत कापड व्यापाऱ्याचे दोन्ही पायांना फ्रॅक्चर झाले असून त्याच्यावर पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत या घटनेने नगर शहरात खळबळ उडाली आहे तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही गंभीर बनला असल्याची भावना व्यापारी वर्तुळात व्यक्त होत आहे. प्रमोद उध्दवराव कुलकर्णी (वय- ५७ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. प्रिंयका कॉलनी, नगर-पुणे रोड, कायनेटीक चौक) असे मारहाण झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. या संदर्भात कोतवाली पोलीस ठाण्यात शिंदे सेनेचा माजी नगरसेवक दीपक साहेबराव खैरे, त्याचा मुलगा मुलगा कृष्णा दीपक खैरे (दोघे रा. मल्हार चौक, कायनेटीक चौकाजवळ, स्टेशन रोड) व त्यांच्या सोबत असलेले दोन अनोळखी अशा चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खैरे याने अतिक्रमण केलेल्या जागेवरील व्यावसायिक गाळ्यांबाबत महापालिकेत तक्रारी केल्याने ही घटना घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादी प्रमोद कुलकर्णी यांचे शहरात माळीवाडा शनी मंदीराजवळ श्री दत्त कलेक्शन नावाने कपड्याचे दुकान आहे. रविवार दिनांक पाच रोजी रात्री साडेआठच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद करून कुलकर्णी हे आपल्या दुचाकीवर (एमएच १६ बीए ००६९) घरी निघाले. पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास कायनेटीक चौकापुढे डाव्या बाजूने सर्व्हीस रोडवरुन जात असताना जुन्या औटी नर्सरीच्या समोर रोडवर अचानक दीपक खैरे याचा मुलगा कृष्णा दीपक खैरे हा त्याच्या हातामध्ये लोखंडी रॉड घेवून त्यांच्या दिशेने धावत येताना दिसला. म्हणून कुलकर्णी हे थांबले असता त्याचे दोन साथीदार हातात लाकडी दांडके घेऊन आले व त्यांनी कुलकर्णींना घेरले. त्यांना काय झाले असे विचारले असता कृष्णा खैरे याने दोन कानाखाली मारल्या व म्हणाला तुला मी आणि माझ्या बापाने किती वेळा सांगितले की, महानगरपालिकेकडे केलेला आमच्या विरोधातील अर्ज मागे घे, पण मादरचोद तू ऐकत नाहीस, आज मी तुला जिंवत सोडणार नाही, आता तुझा गेम खल्लास असे बोलून कृष्णा खैरे याने त्याच्या हातातील लोखंडी रॉड कुलकर्णींच्या ■ पान ४ वर

### दीपक खैरेने अतिक्रमण केलेल्या जागेवरीलगाळे काढण्याचा अर्ज दिल्याने काढला राग

**माजी नगरसेवक दीपक खैरे याने बांधलेल्या अनधिकृत पत्रा गाळे काढण्याविषयी कुलकर्णी यांनी महापालिकैकडे गतवर्षी केलेला अर्ज मागे घ्यावा म्हणून तो सातत्याने दबाव टाकत होता व कुलकर्णी व त्यांच्या भावाला दिव्य मारण्याची धमकी दिली होती. त्याबाबत त्यांनी फेसबुक पोस्ट टाकली होती. या सर्व घटनेचा राग मनात धरून ही मारहाण करण्यात आली असून या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात माजी नगरसेवक दीपक खैरे, त्याचा मुलगा कृष्णा खैरे व दोन अनोळखी साथीदारांवर भारतीय न्याय संहिता कलम ४९, १०९,११८ (२), ११५ (२), ३५१(२), ३५२, ३(५) या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

### दोन्ही पायांवर शस्त्रक्रिया

**जबर मारहाणीमध्ये प्रमोद कुलकर्णी यांच्या डाव्या व उजव्या पायाला गंभीर जखमा झाल्या असुन डाव्या व उजव्या पायाचे हाड फॅक्चर झाले आहे. दोन्ही पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून उजव्या हाताच्या तळहातावर जखम होऊन शरीरावर सुध्दा मुका मार लागला आहे.**

## माळीवाडा वेश पाडू नये म्हणून खंडपीठात याचिका दाखल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर शहरातील ऐतिहासिक ओळख असलेल्या माळीवाडा वेश पाडण्याच्या हालचालींविरोधात अखेर न्यायालयीन लढा उभारण्यात आला असून सामाजिक कार्यकर्ते शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे गटनेते दत्तात्रय हरिभाऊ कावरे यांनी संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल करत प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे. शहराच्या वारशावर घाला घालणाऱ्या या निर्णयाविरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संताप उसळला असून आता हा वाद न्यायालयाच्या दारात पोहोचला आहे.

दरम्यान, दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पुरातत्त्व विभाग, पोलीस अधीक्षक आणि महापौर तसेच नगरसेवक यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. गेल्या वर्षभरापासून नगर शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, खड्ड्यांनी विद्रूप झालेले मार्ग आणि अपूर्ण विकासकामे यावरून प्रशासनावर टीका होत असतानाच माळीवाडा वेश पाडण्याचा मुद्दा समोर आल्याने नागरिकांचा रोष आणखी तीव्र झाला आहे. शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरलेल्या यंत्रणेला अचानक ऐतिहासिक वास्तू पाडण्याची घाई का झाली, असा सवाल आता उघडपणे विचारला जात होता.

माळीवाडा वेश ही सुमारे चारशे वर्षांची ऐतिहासिक वास्तू असून तिचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना उलट ती पाडण्याचा निर्णय घेण्यात आल्याने अहिल्या नगर शहरातील जनतेत संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे सहा महिन्यांन पूर्वीच या विरोधात नितीन भुतारे यांनी आवाज उठवत नागरिकांना जागरूक केले होते. त्यांनी स्वाक्षरी मोहिम राबवून हजारो नागरिकांचा पाठिंबा मिळवला होता. तरीदेखील प्रशासनाने हा विषय पुन्हा पुढे आणल्याने संशय अधिकच बळावला आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली होती. माळीवाडा परिसरातील बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, मंगलताई लोखंडे, दत्ता कावरे नगरसेवकांनी वेश पाडण्यास कडाडून विरोध दर्शवला, तर सत्ताधाऱ्यांनी 'विकास' या नावाखाली येथे महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्याचा मुद्दा पुढे करत वेश पाडण्याची भूमिका घेतली. या भूमिकेमुळे सत्ताधाऱ्यांनी प्रशासनावर दबाव आणल्याची चर्चा रंगू लागली आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे काही महिन्यांपूर्वी महापालिका आयुक्तांनी या कारवाईला स्थगिती दिली होती. मग अचानक हा विषय पुन्हा कसा पुढे आला? कोणाच्या दबावाखाली प्रशासन निर्णय बदलत आहे? या प्रश्नांची उत्तरे देण्यास कोणीही तयार नसल्याने संशय अधिकच गडद होत आहे.

याचिकेसोबत माळीवाडा वेश ऐतिहासिक असल्याचे पुरातत्त्व विभागाचे पत्र, चारशे वर्षांचा इतिहास, तसेच यापूर्वी नागरिकांनी दाखल केलेल्या सुमारे २ हजार हरकतींचा तपशीलही न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. या प्रकरणात ■ पान ४ वर

## शेवगाव येथील सुर्या लॉजवर छापा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शेवगाव तालुक्यातील सुर्या लॉजवर पोलिसांनी छापा टाकून तिघांवर कारवाई केली आहे. तर दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे.

विशाल अर्जुन व्यवहारे (रा. नवीन दहिफळ, ता.शेवगाव), प्रविण सुरेश लांडे (रा. लांडेवस्ती शेवगाव) व नारायण अंकुश झाडे (रा. भेंडा ऑफिसजवळ, ता. शेवगाव) अशी कारवाई करण्यात आलेल्या तिघा आरोपींची नावे आहेत. शहरातील सुर्या लॉज येथे देह विक्री करण्यासाठी महिलांचा वापर केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून तिघांवर कारवाई केली असून दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदरची कारवाई ही पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख, पोलिस निरीक्षक हमीद शेख, सहाय्यक फौजदार शकील शेख, अर्चना काळे, अनिता पवार, छाया रांधवन, एस.एस. काळे, यांनी केली आहे.

## राहुरी व बारामतीसाठी प्रा. शिंदे स्टार प्रचारक

### केंद्रीय भाजपने केली नियुक्ती, प्रचार केला सुरू

**मुंबई । वृत्तसंस्था –** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी व पुणे जिल्ह्यातील बारामती या विधानसभा मतदार संघांच्या पोटनिवडणुकीसाठी केंद्रीय भाजपने ४०जणांच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यात महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचाही समावेश आहे. त्यांनी राहुरी मतदार संघातील भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या उमेदवारी दाखल करण्याच्या वेळी आवर्जून उपस्थित राहून प्रचाराला सुरुवात केली आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी आमदार दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती व राहुरी विधानसभा मतदार संघात येत्या २३ एप्रिलला पोटनिवडणूक होत आहे. बारामतीमध्ये अजितदादा पवार यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना अजितदादा राष्ट्रवादीने व राहुरीमध्ये शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. या दोन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी केंद्रीय व प्रदेश भाजपने तब्बल ४० स्टार प्रचारकांची फळी मैदानात उतरवली आहे.

भाजपाच्या केंद्रीय कार्यालयाकडून ही यादी निवडणूक आयोगाकडे अधिकृतरित्या सादर करण्यात आली आहे. यात अहिल्यानगर जिल्ह्यातून विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदार संघाच्या भाजपच्या आमदार मोनिकाताई राजळे व नगरचे भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे केंद्रीय व राज्यातील मंत्रीही या स्टार प्रचारकांमध्ये आहेत.



सभापती प्रा. राम शिंदे यांनी यापूर्वी तेलंगणा, गोवा, मध्य प्रदेश, राजस्थान व कर्नाटक या राज्यांमधील निवडणुकीमध्ये स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. या राज्यांमधील महत्त्वाच्या मतदारसंघात त्यांनी भाजपच्या उमेदवारांचा प्रचार व प्रसार केला होता. आता राहुरी व बारामती मतदार संघातील महायुतीच्या प्रचारात ते सक्रिय सहभागी होणार आहेत.

विशेष म्हणजे प्रा. राम शिंदे यांना स्टार प्रचारक म्हणून संधी देत भाजपाने त्यांच्या राजकीय वजनाला अधोरेखित केले आहे. बारामती व राहुरी या दोन्ही मतदारसंघांकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे. भाजपने या निवडणुकीसाठी राज्यातील आणि केंद्रातील प्रभावी नेत्यांची फळी मैदानात उतरवून प्रचार मोहीम आक्रमक ■ पान ४ वर

## भाजप महायुतीच्या उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचार नियोजनाची बैठक

### । डॉ. सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन
### । स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांची जनसेवा घराघरात पोहोचवा; कार्यकर्त्यांना आवाहन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचार नियोजनाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप तसेच उमेदवार अक्षय कर्डिले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, राज्यात बारामती व राहुरी येथे पोटनिवडणुका होत असून महाविकास आघाडीने बारामतीसाठी जो निकष लावला, तो राहुरीसाठी लावला नाही. मुख्यमंत्री आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यात चर्चा होऊनही महाविकास आघाडीने उमेदवार दिला, हे पवारांचे षडयंत्र असल्याचा आरोप त्यांनी केला.

विखे पाटील पुढे म्हणाले की, विखे कुटुंबाने अनेक वर्ष जनतेची सेवा केली असून जनतेच्या आशीर्वादाने अक्षय कर्डिले हे निश्चित आमदार होतील. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्याबद्दल दाखवलेली संवेदनशीलता कौतुकास्पद आहे. केरळमधील प्रचाराचा अनुभव सांगताना त्यांनी नमूद केले की, भाजपाचे मताधिक्य नक्कीच वाढणार असून मागील निवडणुकीत १६ टक्के मते मिळाली होती, ती यावेळी ४० टक्क्यांपर्यंत जातील. यावेळी त्यांनी खासदार निलेश लंके यांच्यावर उपरोधिक टीका करत न्यायालयाने माझी याचिका फेटाळली याचे दुःख झाले, मी दोन दिवस जेवलो नाही, असा टोला लगावला.

साखळी पाणी योजनेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी संघर्ष करून ही योजना पुढे नेली. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचे स्वप्न होते की शेतकऱ्यांची शेती बागायत व्हावी. त्या योजनेसाठी निधी मंजूर करून आणण्यात आला असून याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते. तसेच त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, राहुरी पोटनिवडणूक ताकदीने लढवा, कोणीही गाफील ■ पान ४ वर

भव्य भीमगीतांनी दुमदुमले शहर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सुरुवात उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात भव्य भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांच्या पुढाकारातून झालेला हा कार्यक्रम सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देणारा ठरला.

गुरुवारी पांजारपोळ मैदान, माळीवाडा येथे उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा परिसरात कार्यक्रम पार पडला. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या दमदार सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. ''बाबासाहेबांचा विजय असो'', ''जय भीम म्हणत चला'', ''भीमराजा माझा'', ''निळ्या झेंड्याखाली'', ''माझा भीमराजा महान'', ''उठा उठा हो भीमसैनिकांनो'' यांसारख्या भीमगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. हजारोंच्या संख्येने भीमसैनिक व नागरिकांनी उपस्थिती लावत कार्यक्रम ऐतिहासिक ठरवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी गायक आनंद शिंदे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आले.

नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांनी सांगितले की, अहिल्यानगरमध्ये भीम उत्सव बौद्ध पौर्णिमेपर्यंत महिनाभर विविध सामाजिक उपक्रमांसह साजरा केला जाणार आहे. तसेच १४ एप्रिल रोजी भव्य जयंती मिरवणूक काढण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, बाबासाहेबांच्या १३५व्या जयंतीनिमित्त शहरात सुरू झालेला हा उपक्रम विशेष आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याची मागणी पूर्ण झाली असून आंबेडकरी जनतेचे स्वप्न साकार झाले आहे. हा पुतळा केवळ मूर्ती नसून समाजाला प्रेरणा देणारा शक्तिस्थान आहे, असेही त्यांनी नमूद केले. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### रविवारी श्री बिरोबा महाराज यात्रोत्सवाचे निमगाव वाघात आयोजन



अहिल्यानगर- येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त रविवारी (दि.१२ एप्रिल) निमगाव वाघा (ता. नगर) विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर सोमवारी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या नुकतेच झालेल्या अपघाती निधनाने बैलगाडा शर्यत व सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करण्यात आले असून, गावामध्ये दु:खाचे सावट असल्याने दोन्ही उत्सव साध्या पध्दतीने होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी दिली. नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी बुधवारी (दि.८ एप्रिल) रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. यावेळी श्री बिरोबा मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात पै. नाना डोंगरे, देवाचे भगत नामदेव भुसारे, बाबा जाधव, बबन कापसे सहभागी झाले होते.यात्रेनिमित्त गावातील बिरोबा मंदिराला रंगरंगोटी करुन, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. गावातील यात्रा व संदल-उरुसच्या कार्यक्रमातून धार्मिक एकतेचे दर्शन घडणार आहे. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांना उपस्थित राहण्याचे आवाहन सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, किरण जाधव, अनशाबापू शिंदे, बाबा पुंड, रामदास वाखारे, पांडूरंग गुंजाळ, यात्रा उत्सव व संदल-उरुस यशस्वी करण्यासाठी गावातील ग्रामस्थ परिश्रम घेत आहे.

### घोसपुरी गावात अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ज्येष्ठ - वयोवृद्ध व्यक्तीचां सत्कार सोहळा

अहिल्यानगर- ज्येष्ठ नागरिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी घोसपुरी (ता.नगर) येथे शुक्रवारी (ता. १७) सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. निस्वार्थ निरपेक्ष कीर्तन प्रवचन समाज प्रबोधनकार ह.भ.प. राजाभाऊ झरेकर यांच्या पुढाकारातून हा सोहळा होत आहे. घोसपुरी गावातील खामदरा रस्त्यावरील झरेकर वस्ती येथे शुक्रवारी (ता.१७) सायंकाळी ७ वाजता हा सोहळा होणार आहे. निस्वार्थ निरपेक्ष सेवा करणारे ह . भ. प. राजाभाऊ झरेकर महाराज संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या मातोश्रीच्या शेऊबाई झरेकर यांच्या ७५ अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गावातील सर्व ७० वर्षापुढील ज्येष्ठ - वयोवृद्ध व्यक्तींचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. ह भ प निजामभाई शेख आणि सहकाऱ्यांचा अद्वैत तत्वज्ञानावरील भेदिकाचा कार्यक्रम सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणार आहे. त्यानंतर गावातील सर्व ज्येष्ठांचा सत्कार सोहळ होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

### सदाशिव थोरात यांचे वृद्धापकाळाने निधन



अहिल्यानगर - नगर - सोलापूर रोडवरील नगर तालुक्यातील शिराढोण गावातील प्रगतशील शेतकरी तसेच शिराढोण ग्रामपंचायती चे सदस्य सदाशिव शंभू थोरात यांचे गुरुवार दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. शिराढोण गावात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बीएसएनएलचे सहाय्यक महाप्रबंधक श्री.राजू थोरात यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# शिक्षकांनी सोशल मीडियाचा शैक्षणिक वापर समृद्ध करावा - संजय कुलकर्णी

## समर्थ प्रशालेत सोशल मीडिया प्रशिक्षण संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''तंत्रज्ञान व चॅट जीपीटीचे युग आहे. शिक्षकांनी याचा अचूक व चपखल वापर केल्यास अध्ययन–अध्यापन समृद्ध होऊ शकते.ए आयच्या काळामध्ये विविध टूल वापरून आपण शिक्षणाचा आलेख उंचावू शकतो. त्यासाठी प्रत्येक शिक्षकांनी तंत्रस्नेही होणे गरजेचे आहे.'' असे प्रतिपादन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे खजिनदार व समर्थरत्न माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख संजय कुलकर्णी यांनी केले.

सावेडीच्या श्री समर्थ प्रशालेच्या समर्थ सभागृहात श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेच्या चारही शाळांतील सर्व शिक्षकांसाठी तंत्रस्नेही सोशल मीडिया प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी कुलकर्णी बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, कार्यकारणी सदस्या संध्या कुलकर्णी, प्राचार्या तथा मुख्याध्यापिका वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापक सुनील कानडे, पर्यवेक्षक एल.एम.



कुलकर्णी, सोशल मीडिया टीम हेड ऋग्वेद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते समर्थ पूजन संपन्न झाल्यानंतर प्रास्ताविकात वसुधा जोशी यांनी सोशल मीडियातील तंत्रज्ञान शिक्षण व कौशल्यांचे महत्त्व विशद केले.

प्रशिक्षणामध्ये संजय कुलकर्णी यांनी पीपीटी प्रेझेंटेशनमध्ये फेसबुक, इंस्टाग्राम ,व्हाट्सअप व अन्य गतिमान सोशल मीडिया ॲपची माहिती प्रत्यक्षिकासह प्रस्तुत केली. गुगल प्ले स्टोअर वरील शिक्षकांसाठी महत्त्वाचे असलेले विविध ॲप्स शिक्षकांना प्रात्यक्षिकाद्वारे मोबाईल मध्ये डाउनलोड करून त्याची कार्यवाही देखील लगेचच सुरू झाली. ऋग्वेद कुलकर्णी यांनी चॅट जीपीटी, गुगल डॉक्युमेंट, युट्युब, जी बोर्ड यांची प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली.

फोटो– व्हिडिओ एडिटिंग, चॅट जीपीटीचा वापर, व बॉक्सचे महत्त्व, शिक्षकांसाठी महत्त्वाचे असणारे ॲप्स याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार विजेते तंत्रस्नेही शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी माहिती दिली.

क्षीरसागर यांनी विशद केले की ''आपल्याकडे असलेला मोबाईलचा सकारात्मक पुरेपूर वापर करून आपण विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानसंपदा निश्चितच देऊ शकतो.''

श्रीपाद कुलकर्णी यांनी नमूद केले की ''मोबाईलद्वारे सोशल मीडियाचा वापर करताना तारतम्य बाळगतानाच त्यातील शिक्षण क्षेत्रासाठी हवे ते मोजके शोधून व हेरून आपणअसे ई–शैक्षणिक साहित्य शाळेच्या व्यासपीठावर निश्चितच आणले पाहिजे.''

प्रश्नोत्तर सत्रामध्ये शिक्षकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.स्वागत एल. एम. कुलकर्णी यांनी केले तर आभार धनश्री गुंफेकर यांनी मानले.

# समशानभूमीवरील अतिक्रमणाविरोधात रिपब्लिकन सेनेचे आमरण उपोषण

## कवडगाव येथील मागासवर्गीयांच्या जागेवर ऊस लागवडी करून ताबा; कारवाईची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड तालुक्यातील मौजे कवडगाव येथे मागासवर्गीय समाजाच्या समशानभूमीवर अतिक्रमण झाल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून दोषींवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे कवडगाव येथील जुना सर्वे क्रमांक १२२ याचे एकत्रीकरण होऊन नवीन गट क्रमांक ३६६/१/२ मध्ये सुमारे दोन एकर क्षेत्र नदी व ओढ्याच्या काठी असून, यापैकी सुमारे ८० आर जागा मागासवर्गीय समाजाच्या समशानभूमीसाठी पिढ्यान् पिढ्या वापरात आहे. सन १९७० पासून या जागेची नोंद उताऱ्यावर असल्याचे सांगण्यात आले आहे. या ठिकाणी आजवर समाजातील मृत व्यक्तींचे अंतिम संस्कार होत आले आहेत.

या समशानभूमीला लागून असलेल्या जमिनीचे मालक महादेव रामचंद्र शेंडगे यांनी समशानभूमीच्या जागेत अतिक्रमण करून ऊस लागवड केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याला विरोध केल्यामुळे शेंडगे कुटुंबाकडून दमदाटी व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप आढाव कुटुंबीयांनी केला असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तसेच समशानभूमीची जागा तात्काळ मोकळी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात आले आहे.या उपोषणात रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष बाळू वाघमारे, बळीराम शिंदे, रामदास आढाव, सुनीता शिंदे, नेहा जावळे, मंगल बरकडे, बबीता शिंदे, कृष्णा गाडे यांसह कवडगाव येथील ग्रामस्थ आणि पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# महात्मा फुले जयंतीनिमित्त माळीवाडा वेस येथे मंडप उभारण्याची मागणी

## कृती समितीचे आयुक्तांना निवेदन; शनिवारी सकाळी १० वाजता होणार अभिवादन कार्यक्रम । स्वच्छता व बैठक व्यवस्थेचीही मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ११ एप्रिल २०२६) माळीवाडा वेस येथील त्यांच्या पुतळ्यासमोर महापालिकेतर्फे मंडप उभारण्यात यावा, अशी मागणी



क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिराव फुले कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमासाठी शहरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० वाजता आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असल्याची माहिती कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर, जयंतीच्या दिवशी पुतळा परिसराची स्वच्छता करण्यात यावी, तसेच नागरिकांसाठी योग्य बैठक व्यवस्था आणि मंडप उभारण्यात यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने नागरिक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याने योग्य सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे समितीने नमूद केले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# दिव्यांग महिलेच्या ९ वर्षांच्या संघर्षाला न्याय उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

## सावेडी येथे २०० चौ.फुट जागा देण्याचे निर्देश; टी–स्टॉल व्यवसायाचे स्वप्न साकार होणार । प्रशासनाकडून तात्काळ अंमलबजावणीची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** दिव्यांग कायद्यांतर्गत हक्काची जागा मिळवण्यासाठी तब्बल ९ वर्षे सातत्याने संघर्ष करणाऱ्या जबीन फारुक शेख या दिव्यांग महिलेला अखेर न्याय मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालय यांच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्या बाजूने निकाल देत सावेडी येथील २०० चौ.फुट जागा देण्याचे आदेश दिले आहेत.

जबीन शेख या अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील माळीवाडा परिसरातील रहिवासी असून त्या दिव्यांग आहेत. उपजीविकेसाठी कोणतेही साधन नसल्याने त्यांनी स्वतः चा छोटा टी–स्टॉल व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार केला होता. मात्र, स्वतःच्या मालकीची जागा नसल्यामुळे त्यांचे हे स्वप्न वर्षानुवर्षे अपूर्णच राहिले.

यासाठी त्यांनी सन २०१९ मध्ये मुंबई उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) येथे रिट पिटीशन क्रमांक १२४९८/२०१९ दाखल केली होती. शासनाच्या जीआरनुसार दिव्यांग व्यक्तींना उपजीविकेसाठी २०० चौ.फुट जागा उपलब्ध करून देण्याची तरतूद असल्याचा मुद्दा त्यांनी न्यायालयासमोर मांडला होता.

न्यायालयाने या प्रकरणाची सखोल सुनावणी करून ३० मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या निर्णयानुसार अहिल्यानगर येथील तहसीलदार यांनी सावेडी येथील सर्व्हे नंबर ८९ क मधील २०० चौ.फुट जागा जबीन शेख यांना व्यवसायासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उच्च न्यायालयात ॲड. अमोल गवळी यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी मदत केली.

सदर निर्णयानंतर जबीन शेख यांनी तहसीलदारांकडे अधिकृत अर्ज सादर करत न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. ''मला उपजीविकेसाठी टी–स्टॉल सुरू करायचा आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जागा तात्काळ ताब्यात मिळावी,'' प्रशासनाने विलंब न लावता न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

# भिंगार अर्बन बँकेला रुपये ६ कोटी ४२ लाखांचा ढोबळ नफा - अनिलराव झोडगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**भिंगार अर्बन बँकेला मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात रु.६ कोटी ४२ लाखांचा ढोबळ नफा झाला असून आयकर व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सुचनांनूसार आवश्यक त्या तरतुदी करुन निव्वळ नफा रु. ४ कोटी २१ लाखांचा झालेला आहे. मार्च २०२६ अखेर ठेवींमध्ये मागील वर्षापेक्षा ४६.६० कोटीने वाढ होऊन एकुण ठेवी ३८६.८६ कोटी, कर्जामध्ये ४३.२८ कोटीने वाढ होऊन, चालुवर्षी एकूण कर्जे २७७.५९ कोटी, व व्यवसायामध्ये ८९.८८ कोटीने वाढ होऊन चालुवर्षी एकूण व्यवसाय ६६४.४५ कोटी झालेला आहे. निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ०% राखण्यात यश मिळविले आहे. बँकेने सभासदांना सातत्याने १५% लाभांश दिलेला असून चालू वर्षीही १५% लाभांश वितरीत करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.असे प्रतिपादन बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे





यांनी केले

पुढे बोलताना झोडगे म्हणाले कि सभासदांचा, खातेदारांचा बँकेवरील विश्वास बँकेचे कर्मचारी, संचालक मंडळाचे विश्वासपूर्ण काम यामुळेच बँक सातत्याने प्रगती करीत असल्याचे त्यांनी सांगितले. बँकेमार्फत थोर समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांचे जयंतीचे औचित्य साधुन दि. ११ एप्रिल २०२६ रोजी नेत्र तपासणी शिबिर ठेवण्यात आलेले आहे तरी सर्व सभासद व गरजु व्यक्तिनी त्याचा लाभ घ्यावा असे अवाहन बँकेमार्फत करण्यात आले आहे.

व्हा.चेअरमन किसनराव चोधरी म्हणाले कि बँकिंग बरोबर सभासदांचे गुणवंत विदयार्थ्यांना प्रोत्साहन देणे, सामाजीक उपक्रम राबविणे, कर्मचारी प्रशिक्षणाव्दारे अधिकाधिक उत्कृष्ट ग्राहक सेवेव्दारे बँकेचा नावलौकिक वाढत असुन व्यवसायामध्ये भरघोस वाढ होवुन बँकेची सर्वांगीण प्रगती होत असल्याचे सांगितले

प्रास्तविक मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन यांनी केले त्यांनी बँकेच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम याची माहिती दिली .

यावेळी चेअरमन अनिलराव झोडगे ,व्हा. चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर , कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, श्रीमती. तिलोत्तमा करांडे, अनिता भुजबळ, तज्ञ संचालक रामसुख मंत्री, राजेंद्र बोरा उपस्थित होते.

# शाळांची पटपडताळणी पुढे ढकलण्याची शिक्षक सेनेची मागणी

## ऑनलाईन संच मान्यतेद्वारे पदांची निश्चिती व समायोजन सुरू असताना प्रत्यक्ष पटपडताळणीची आवश्यकता काय,? –प्रसाद शिंदे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शाळांची पटपडताळणी प्रक्रिया पुढे ढकलावी अथवा पूर्णपणे रद्द करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राज्यातील शाळांमध्ये दि. ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ रोजी पटपडताळणी आयोजित करण्यात आली आहे. मात्र, याच कालावधीत इयत्ता २री इयत्ता ९ वी व ११ वीच्या परीक्षा सुरू असून इतर शैक्षणिक उपक्रमही सुरू आहेत. त्यामुळे शाळांच्या नियमित शैक्षणिक कामकाजावर याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



राज्यातील बहुतांश शाळांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक आधीच निश्चित केले असून काही ठिकाणी पुढील इयत्तांसाठी जादा तासांचे नियोजनही करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत अचानक येणाऱ्या पटपडताळणीमुळे शाळांच्या नियोजनात अडथळे निर्माण होत असल्याची बाब शिक्षक सेनेने स्पष्ट केले आहे.

याशिवाय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर सध्या विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा ताण मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये बीएलओ म्हणून मतदार यादी अद्ययावत करणे, निवडणूक संबंधित कामे, टीइटी परीक्षा तयारी, जनगणना कामे, शासनाच्या विविध सर्वेक्षणांची अंमलबजावणी, तसेच ऑनलाईन नोंदी व माहिती भरणे अशा अनेक जबाबदाऱ्या समाविष्ट आहेत. या सर्व कामांमुळे शिक्षक आधीच व्यस्त असून, त्यात पटपडताळणीची भर पडल्यास अडचणी वाढणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शासनाकडून ऑनलाईन संच मान्यतेद्वारे पदांची निश्चिती व समायोजन प्रक्रिया सुरू असताना प्रत्यक्ष पटपडताळणीची आवश्यकता काय,? असा प्रश्नही प्रसाद शिंदे यांनी उपस्थित केला आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून राज्यातील शाळांची पटपडताळणी प्रक्रिया पुढे ढकलावी किंवा संबंधित आदेश रद्द करण्यात यावा, अशी मागणी शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### निरोगी आयुष्यासाठी शहरात 'एज लॉकिंग वॉकिंग रोड' उपक्रम



अहिल्यानगर - शहरातील आरोग्य क्षेत्रात एक अभिनव आणि ऐतिहासिक पाऊल उचलत 'एज लॉकिंग वॉकिंग रोड' या अनोख्या आरोग्य उपक्रमाचा शुभारंभ रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता होणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त पुढाकारातून, जनलोक अदालतमार्फत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.पंपिंग स्टेशन या मार्गावर हा ''आरोग्य महामार्ग'' सुरू होणार असून, हा केवळ चालण्याचा रस्ता नसून नागरिकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणणारा उपक्रम ठरणार आहे. ''वय वाढणे थांबत नाही, पण वृद्धत्व नियंत्रित करता येते!'' हा संदेश या मोहिमेद्वारे दिला जाणार आहे.या उपक्रमामागे 'एज लॉकिंग' म्हणजेच वृद्धत्व नियंत्रणाची संकल्पना असून, ती विज्ञानाधारित आणि व्यवहार्य जीवनशैलीवर आधारित आहे. आयोजकांनी नागरिकांना पुढील तीन महत्त्वाच्या गोष्टींचे पालन करण्याचे आवाहन केले आहेदररोज ३० ते ६० मिनिटे वेगाने चालणे, ज्यामुळे हृदय, फुफ्फुसे आणि शरीराची चयापचय प्रक्रिया सुदृढ राहते.''अन्नच औषध'' या तत्त्वावर आधारित ताज्या फळे, भाज्या आणि तंतुमय आहाराचा समावेश करणे.शरीर, मन आणि पर्यावरण यांचा समतोल साधणारी शिस्तबद्ध व जागरूक जीवनशैली अंगीकारणे.या उपक्रमात जनलोक अदालत केवळ न्यायनिवाड्यापुरती मर्यादित न राहता, आरोग्य जनजागृती, जनसहभाग, अंमलबजावणी आणि सामाजिक जबाबदारी यावर लक्ष ठेवणारी ''कोर्ट ऑफ अ‍ॅक्शन'' म्हणून कार्यरत राहणार आहे.नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये दररोज स्टेप ट्रॅकिंग (मोबाईल किंवा समूह नोंदीद्वारे), साप्ताहिक आरोग्य तपासणी व मॉनिटरिंग, ''एज लॉकिंग नागरिक'' प्रमाणपत्र वितरण, तसेच प्रत्येक वॉर्डमध्ये वॉकिंग ग्रुप्स तयार करण्याचा समावेश आहे.वैज्ञानिक आधारावर उभारलेली ही संकल्पना ''जलद चालणे + अन्नच औषध + जागरूकता'' या सूत्रावर आधारित असून, हा उपक्रम नागरिकांना निरोगी, संतुलित आणि दीर्घायुष्याच्या दिशेने नेणारा ठरेल.आयोजकांनी अहिल्यानगरकरांना आवाहन केले आहे की, १९ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य चळवळीला पाठिंबा द्यावा.''हा रस्ता केवळ चालण्यासाठी नाही, तर माणसाच्या आयुष्याला 'एज लॉक' करून त्याला रोगमुक्त, जागरूक आणि दीर्घायुषी बनवण्यासाठी आहे. आज चालाल उद्या वाचाल!'' असा प्रभावी संदेश देण्यात आला आहे.

### कलावती कळमकर यांचे निधन

अहिल्यानगर (प्रतिनिधी)- खातगाव टाकळी (ता. नगर) येथील रहिवासी कलावती केरूजी कळमकर (वय १००) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्यामागे दोन मुले, चार मुली, नातवंडे, परतंडे असा परिवार आहे. गावातील धार्मिक कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असत. सेवानिवृत्त महसूल अधिकारी दिलीप कळमकर आणि प्रगतशील शेतकरी वसंत कळमकर यांच्या त्या मातोश्री होत.

# वि.ही. प.अहिल्यानगर जिल्हा नवीन नियुक्त्या जाहीर




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताची बैठक ५ एप्रिल रोजी पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीला केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद जी परांडे तसेच प्रांत अध्यक्ष श्री,गजानन धरणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रांत मंत्री श्री. किशोर चव्हाण यांनी यावेळी नवीन नियुक्त्या जाहीर केल्या.

सध्याचे विभाग मंत्री श्री,सुनील खिस्ती यांना प्रांत सत्संग सह प्रमुख अशी अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली तर जिल्हा सहमंत्री म्हणून ,राजेंद्र चुंबळकर व

प्रताप तांदळे यांची नियुक्ती करण्यात आली, तसेच बजरंग दल जिल्हा संयोजक म्हणून

सोमनाथ चितळकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना

मिलिंद परांडे यांनी सांगितले की, ''संघटनेची खरी ताकद ही कार्यकर्त्यांच्या शिस्त, समर्पण आणि निष्ठेमध्ये असते.तरुण शक्तीला योग्य दिशा दिल्यास विहिंपचे कार्य अधिक व्यापक आणि परिणामकारक होईल.

या प्रसंगी जिल्हा पालक व प्रांत सहमंत्री अ‍ॅड. श्री,सतीश गोरडे, जिल्हाध्यक्ष श्री,आशुतोष लांडगे, जिल्हा मातृशक्ती प्रमुख हिराताई शहापुरे, विभाग संयोजिका पुजाताई लष्करे, दुर्गा वाहिनी जिल्हा संयोजिका जयश्रीताई पोटे तसेच प्रांतातील सर्व जिल्ह्यांमधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीमुळे पश्चिम महाराष्ट्रात विहिंपच्या कार्याला नवी ऊर्जा मिळणार असून, संघटन विस्ताराला गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## नवोदय प्रवेशात सारा शेखची ९९ टक्के गुणश चमकदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा–** पिंप्री कोलंदर (ता. श्रीगोंदा) येथील सारा निसार शेख हिने नवोदय प्रवेश परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून तिची पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय टाकळी ढोकेश्वर साठी निवड झाली आहे. अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या या परीक्षेत तिने मिळवलेले गुण विशेष उल्लेखनीय मानले जात आहेत.



सारा ही सुप्रसिद्ध शाहीर निजामभाई शेख यांची नात तसेच पराक्रमा शैक्षणिक संकुलाचे प्राध्यापक दाम्पत्य प्रा. डॉ. निसार शेख व प्रा. डॉ. जस्मीन शेख यांची कन्या आहे.

ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, म्हातार पिंप्री येथील विद्यार्थिनी असून शालेय जीवनात यापूर्वीही तिने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवले आहे. मुख्याध्यापक शरद गावडे, वर्गशिक्षक विठ्ठल शिंदे, शैला गावडे आणि सुनिता ढवळे-शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले.

साराने नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. भविष्यात उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी कार्य करण्याची तिची इच्छा आहे. तिच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, पालक आणि शिक्षणप्रेमींनी तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पेमराज सारडा महाविद्यालयात अकरावी ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयामध्ये इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे अशी माहिती कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉक्टर पारस कोठारी यांनी दिली.

ज्यांनी दहावीची परीक्षा दिलेली आहे अशा विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी गतवर्षीपासून पूर्णपणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवायला सुरुवात झालेली आहे. गतवर्षी विद्यार्थ्यांचा मोठा गोंधळ उडाल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्याचा त्रास झाला. आणि पालकांना आर्थिक झळ बसली होती. यामुळेच या वेळेला शासनाकडून ही प्रक्रिया लवकर सुरू करण्यात आलेली आहे. असे असले तरीही विद्यार्थ्यांना या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनंत अडचणी येतात त्यांच्याकडून चुका होतात, आणि चुकीचे फॉर्म भरल्यामुळे पुढे प्रवेशासही अडचण निर्माण होते या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुढाकार घेऊन सर्व विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे अशी माहिती प्राचार्य डॉक्टर माहेश्वरी गावित यांनी दिली आहे.

या ऑनलाइन प्रवेशामध्ये सुरुवातीला विद्यार्थ्यांचा पार्ट १ भरावयाचा असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी पेमराज सारडा महाविद्यालय येथे सकाळी ११ ते ३ या वेळेत उपस्थित रहावे तसेच अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री गिरीश पाखरे यांनी केले आहे. ९७६७७ १७२७२, ७२७६७९४००८, ९९६०६०९७३८.

## बिडकीन पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक; आंबेडकर जयंती पार्श्वभूमीवर मार्गदर्शन

### जयंती उत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन; विविध मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**येथील पोलीस ठाण्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

बैठकीत बिडकीन पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेळके साहेब यांनी जयंतीनिमित्त पाळावयाच्या नियमांविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच सण-उत्सव शांततेत व सलोख्याने साजरे करण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

या बैठकीला आर.पी.आय. (आठवले गट) चे प्रदेश सचिव अमोल भैया नरवडे, पत्रकार नंदकुमार वैद्य, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तमिजोद्दीन इनामदार, रांजणगावचे सरपंच भिसे, चितेगाव नगरीचे संपादक अमर सय्यद, शेख साहेब, रफीक पटेल, प्रवीण चव्हाण, अमोल पवार यांच्यासह सर्व पत्रकार बंधू, महिला पोलीस



पाटील, बिडकीन सर्कलमधील सर्व पोलीस पाटील व सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच विविध ठिकाणांवरील आंबेडकर जयंती उत्सव समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

कार्यक्रमाचे नियोजन व आभार प्रदर्शन डी. एस. बी. चे दिलवाले साहेब यांनी केले.

## शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या थेट नागरिकांपर्यंत पोहोचवा - आमदार दाते

### चास येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–**महसूल विभागाच्या माध्यमातून राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे त्वरित निराकरण व्हावे, तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' अंतर्गत आज नगर तालुक्यातील चास येथे मंडळस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या उपक्रमाद्वारे तास मंडळातील ग्रामीण भागातील नागरिकांना रहिवासी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यांसह विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच सात-बारा उतारे वाटप, प्रलंबित फेरफार नोंदींचे निराकरण आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता यासंबंधी कामेही तात्काळ करण्यात आली.

> **''शेत रस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आ. दातेंचे मोठं योगदान''**
>
> **आज संपन्न होत असलेल्या या अभियानाच्या माध्यमातून विविध ९ योजनांतर्गत ८३८ लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला असून, यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक आभार. तहसील कार्यालयात येणाऱ्या सुमारे ५० टक्के तक्रारी या रस्त्यांशी संबंधित असून जमीन विभाजनामुळे या समस्या अधिक वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर बळीराजा शेतपानंद रस्ते योजना राबवून शेतजमिनीपर्यंत कायमस्वरूपी रस्ते सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांची दळणवळणाची अडचण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.**
>
> **- सुधीर पाटील**
> **(उपविभागीय अधिकारी)**

नागरिकांच्या सोयीसाठी महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, आरोग्य, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, महावितरण, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन (एस.टी.), शिक्षण आदी विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. यामुळे उपस्थित नागरिकांनी आपल्या अडचणी मांडून तत्काळ मार्गदर्शन व सेवा प्राप्त केली.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ''शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या थेट नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, हा या शिबिरामागचा मुख्य उद्देश आहे. सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा वेळेत आणि सुलभ पद्धतीने मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अशा शिबिरांमुळे जनतेचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ होतो आणि प्रशासन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख बनते.''

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार गौरव दळवी, शिवराज पवार, माजी सभापती रामदास भोर, सरपंच युवराज कार्ले, सरपंच सोनेवाडी विठ्ठलराव दळवी, युवा नेते सिद्धेश आंधळे, वैष्णव पठारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सेतु चालक, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित कामांना गती मिळाली असून प्रशासनाच्या लोकाभिमुख उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडलाधिकारी रुपाली टेमक यांनी केले.

## नेप्ती जिल्हा परिषदेच्या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात; गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ग्रामस्थांची भरभरून दाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माजी सरपंच विठ्ठल जपकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित त्यांच्या हस्ते सन्मान करून सत्कार करण्यात आला . या स्नेहसंमेलनाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने संपूर्ण शाळावर आकर्षक विद्युत रोषणाई केली होती अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



या कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी गाणी, लावण्या , नृत्याविष्कार, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाटिका सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडलत होते. स्नेहसंमेलन कार्यक्रम पाहण्यासाठी सरपंच , उपसरपंच, सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य ,सोसायटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी , मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, ग्रामस्थ , महिला, पालक व परिसरातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले तसेच शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांनी भरभरून आर्थिक मदत दिली. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका आशा ढोले , बाळासाहेब कापसे, बाळासाहेब नवले, नूतन पाटोळे, सविता गोरे, राजश्री कोल्हे ,मिराबाई जपकर ,शिक्षक व ग्रामस्थ यांनी उत्कृष्टरीत्या केले.

यावेळी बाळासाहेब नवले सर यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. सरपंच सविता संजय जपकर यांनी कार्यक्रमासाठी पंचविस हजार रुपयाची देणगी दिली.

## मुलीला त्रास देणाऱ्या तरुणावर कारवाईची मागणी

### पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर वडिलांचे उपोषण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुलीला सतत छेडछाड करून मानसिक त्रास देणाऱ्या तरुणावर कठोर कारवाई करावी आणि कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे, या मागणीसाठी बुऱ्हानगर येथील युवराज शिंदे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.




युवराज शिंदे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या मुलीला आकाश प्रेमराज शिंदे हा तरुण वारंवार छेड काढत असून येताना-जाता त्रास देत आहे. याबाबत २६ ऑगस्ट २०२४ रोजी पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच, ११ फेब्रुवारी २०२५ रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आझाद मैदान येथे उपोषण करून तक्रार मांडण्यात आली होती. त्यानंतर गृह खात्याकडून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, तरीही संबंधित व्यक्तीवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे शिंदे यांनी नमूद केले.शिंदे कुटुंबीय आणि संबंधित व्यक्ती यांच्यात मिळकतीच्या वादातून न्यायालयात फौजदारी प्रकरणे व दावे प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवरच आरोपीकडून जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शिंदे यांनी पुढे सांगितले की, संबंधित तरुण त्यांच्या घराजवळ राहतो आणि पहाटेच्या सुमारास मोठ्या आवाजात अश्लील गाणी लावून त्रास देतो. तसेच, ते आणि त्यांची पत्नी मोलमजुरीसाठी बाहेर असताना मुलगी घरी एकटी असते, त्या वेळी आरोपी अश्लील हावभाव करून मानसिक छळ करतो.

याव्यतिरिक्त, ''तुम्ही कोणत्याही अधिकाऱ्यांकडे किंवा मंत्र्यांकडे गेलात तरी काही होणार नाही, तसेच तुमच्या घरावर हल्ला करून मारहाण करू,'' अशा धमक्याही देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कुटुंबीयांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

# बाजार समितीवर बेलकर-सालके यांची बिनविरोध निवड

## खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व कायम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी गंगाराम तुकाराम बेलकर तर उपसभापतीपदी संदीप लक्ष्मण सालके यांची गुरुवारी बिनविरोध निवड झाली. सत्ताधारी गटाचे स्पष्ट बहुमत आणि समन्वयाच्या भूमिकेमुळे ही निवड कोणत्याही निवडणुकीशिवाय एकमताने पार पडली.

मावळते सभापती किसनराव रासकर व उपसभापती किसनराव सुपेकर यांनी इतर संचालकांना संधी देण्याच्या भूमिकेतून १२ मार्च रोजी आपल्या पदांचे राजीनामे दिल्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी प्रक्रिया सुरू झाली होती. इच्छुक संचालकांनी सक्रिय हालचाली करत आपापली भूमिका मांडली होती.

या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी संचालकांमध्ये एकमत घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. संचालकांना ढवळपुरी येथील अंकुर व्हॅली येथे सहलीसाठी पाठवून आपापसात चर्चा करून निर्णय घेण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र, सहलीदरम्यान ठोस एकमत होऊ शकले नाही.

अखेर गुरुवारी सकाळी सर्व संचालकांना पारनेर येथील खासदार लंके यांच्या संपर्क कार्यालयात बोलावण्यात आले. येथे प्रत्येक संचालकाची भूमिका समजून घेतल्यानंतर सभापतीपदी गंगाराम बेलकर व उपसभापतीपदी संदीप सालके यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.

यानंतर अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक विकास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समितीच्या सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. सभापतीपदासाठी गंगाराम बेलकर व उपसभापतीपदासाठी संदीप सालके यांचे प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. सचिव सुरेश आढाव यांनी निवड प्रक्रियेस सहकार्य केले.

१८ सदस्यीय संचालक मंडळात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व खासदार नीलेश लंके समर्थकांचे स्पष्ट वर्चस्व असून १२ सदस्य राष्ट्रवादीचे, ५ शिवसेना ठाकरे गटाचे व १ सदस्य अजित पवार गटाचा आहे. त्यामुळे पदाधिकारी निवड बिनविरोध होणे अपेक्षित होते.

निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित सभापती गंगाराम बेलकर यांनी सर्व संचालकांना विश्वासात घेऊन बाजार समितीचा विकास साधण्याची ग्वाही दिली. उपसभापती संदीप सालके यांनीही पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांचा आदर्श पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

निवड जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष करत नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. त्यानंतर खासदार नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार सोहळा पार पडला.

# चांगतपुरीत सप्ताह सांगता; अपघातग्रस्त कुटुंबाला आमदार विलास भुमरेंचा आधार

## एक लाखांची मदत जाहीर; मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील चांगतपुरी येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाला आमदार विलास भुमरे यांनी उपस्थिती लावत सामाजिक बांधिलकी जपली. काही दिवसांपूर्वी घडलेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याने संबंधित कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे.



या पार्श्वभूमीवर आमदार भुमरे यांनी मृताच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत देत दिलासा दिला. तसेच, मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याची जबाबदारी स्वीकारत मदतीचा हात पुढे केला.

यावेळी महंत बाबा महाराज गिरी यांनी ११ हजार रुपयांची मदत दिली. कार्यक्रम धार्मिक वातावरणात पार पडला असून हरिनाम सप्ताहाच्या सांगता निमित्त गावातून मिरवणूक, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगराध्यक्ष भूषण कावसानकर पंचायत समिती सदस्य सखुबाई झारगड , ग्रामस्थ, मान्यवर आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ज्येष्ठांच्या सभागृहात युवा प्रतिनिधींचा सहभाग हा सक्षम लोकशाहीसाठी सकारात्मक संकेत - सभापती प्रा. राम शिंदे

## राष्ट्रकुल संसदीय मंडळ विभाग ७ च्या पणजी वार्षिक परिषदेत विकसित भारत २०४७ चे उद्दीष्ट साध्य करतांना विधिमंडळातील युवा सदस्यांची भूमिका आणि व्यापार, पर्यटन, नागरीकरण, पर्यावरण, तटीय संपर्कयंत्रणा यासाठी क्षेत्रीय प्राधान्यक्रम या विषयांवर विचारमंथन

**पणजी । वृत्तसंस्था–** महाराष्ट्र विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखले जात असले तरी अलीकडच्या काळात युवा प्रतिनिधींचा वाढता सहभाग आणि संख्याबळ सक्षम लोकशाहीसाठी सकारात्मक संकेत असल्याचे मत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केले. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र – गोवा गुजरात या विभाग ७ च्या पणजी येथे आयोजित वार्षिक परिषदेच्या उद्घाटनसत्रात ते बोलत होते. लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ व १० एप्रिल, २०२६ रोजी ही परिषद पणजी येथे आयोजित करण्यात आली असून त्यास राज्यसभेचे उप सभापती श्री. हरिवंश सिंह, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे, महाराष्ट्रासह राज्यविधानमंडळांचे सदस्य उपस्थित आहेत. गोवा विधानसभेचे अध्यक्ष डॉ. गणेश गावकर आणि गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीही या परिषद उद्घाटनसत्रात आपले महत्वपूर्ण विचार मांडले.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ विभाग ७ च्या या पणजी वार्षिक परिषदेत विकसित भारत २०४७ चे उद्दीष्ट साध्य करतांना विधिमंडळातील युवा सदस्यांची भूमिका आणि व्यापार, पर्यटन, नागरीकरण, पर्यावरण, तटीय संपर्कयंत्रणा यासाठी क्षेत्रीय प्राधान्यक्रम या दोन विषयांवर विचारमंथन होईल. सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लखनऊ येथे झालेल्या पीठासीन अधिकारी परिषदेत या




विभाग परिषद उपक्रमाची बीजे रोवली गेली आणि आज ती प्रत्यक्षात साकारली आहेत. '२०४७ पर्यंत विकसित भारत' या पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील राष्ट्रीय ध्येयाच्या पूर्ततेत युवा विधिमंडळ सदस्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. नागपूर हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित केल्या जाणाऱ्या 'संसदीय अभ्यासवर्ग' उपक्रमाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या माध्यमातून विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते आणि या उपक्रमातून घडलेले विद्यार्थी आज विधिमंडळात प्रतिनिधित्व करत आहेत. विधिमंडळ कामकाजातील युवा सदस्यांच्या सहभागाचे महत्व स्पष्ट करतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे उल्लेखनीय योगदान सभापती प्रा. राम शिंदे यांनी अधोरेखीत केले.

परिषदेत 'व्यापार, पर्यटन, शहरीकरण, पर्यावरण आणि तटीय संपर्क' या महत्त्वाच्या विषयांवरही सखोल चर्चा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुजरात, महाराष्ट्र आणि गोवा या तिन्ही राज्यांचा विस्तृत सागरी किनारा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, 'ब्लू इकॉनॉमी' मजबूत करताना मच्छीमार समुदायाचा विकास आणि पर्यावरण संवर्धन यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, 'सर्क्युलर टुरिझम सर्किट' सारख्या संयुक्त पर्यटन उपक्रमांमुळे राज्यांमध्ये आर्थिक सहकार्य वाढू शकते, असेही त्यांनी नमूद केले. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, अहमदाबाद आणि पणजी यांसारखी शहरे 'स्मार्ट' बरोबरच 'संवेदनशील' आणि पर्यावरणपूरक बनविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. ही परिषद म्हणजे केवळ औपचारिक संवाद नसून एक सामूहिक संकल्प आहे. सन – २०४७ च्या 'स्वर्णिम भारत' निर्मितीत विभाग – ७ चा मोलाचा वाटा राहिल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या परिषदेमुळे तिन्ही राज्यांच्या विधिमंडळांमध्ये नव्या कल्पना, धोरणे आणि सहकार्याचा नवा अध्याय सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# तहसीलदारांच्या गैरहजेरीमुळे अतिक्रमण कारवाई रखडली; कडेठाणमध्ये संताप

## गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी ग्रामस्थ दिवसभर ताटकळत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील गेवराई मर्दा – कडेठाण खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील गायरान जमीन गट क्रमांक २३/२४ वरील अतिक्रमण हटवण्याची कारवाई तहसीलदारांच्या गैरहजेरीमुळे रखडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या कारवाईसाठी ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सकाळपासून घटनास्थळी उपस्थित होते. महसूल विभागाच्या उपस्थितीत अतिक्रमण हटवण्याची अपेक्षा होती. मात्र, तहसीलदार घटनास्थळी न आल्याने कारवाईला विलंब झाला. ग्रामस्थांनी प्रशासनाच्या दिरंगाईबाबत नाराजी व्यक्त करत, ''शासन अतिक्रमण हटवण्याबाबत भूमिका स्पष्ट करत असताना प्रत्यक्ष कारवाईच्या वेळी अधिकारी अनुपस्थित राहणे योग्य नाही,'' अशी प्रतिक्रिया दिली.

दरम्यान, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनीही या प्रकरणात स्पष्ट भूमिका घेण्याची मागणी करत महसूल विभागाने तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तहसीलदारांच्या अनुपस्थितीमुळे घटनास्थळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. संबंधित अधिकारी घटनास्थळी येऊन कारवाई पूर्ण करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणी तहसीलदारांकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण मिळाले नसून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# साकुरीत झुडिओचा डंका; माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी जवळील साकुरी शिवारात टाटा समूहाच्या मालकीच्या प्रसिद्ध झुडिओ या कपड्यांच्या भव्य दालनाचा नुकताच मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. उपासनी महाराज संस्थानच्या कुमारी माधवीताई गुरु गोदावरी आणि राज्याचे माजी महसूलमंत्री आ. बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते फित कापून या शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात यांनी शोरूममधील व्यवस्थेची पाहणी केली आणि कौतुक केले. ते म्हणाले की, ''शिर्डी सारख्या आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्राच्या इतक्या जवळ इतके भव्य शोरूम सुरू झाल्यामुळे या भागाच्या अर्थकारणाला मोठी बळकटी मिळेल. शेतकरी पुत्रांनी आता केवळ शेतीवर अवलंबून न राहता, नवनवीन प्रकल्प राबवून उद्योग-व्यवसायातही पुढे येण्याची गरज आहे.''

तसेच, दंडवते परिवाराने स्व. भानुदास पाटील दंडवते यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे व्यापारी संकुल उभारून शिर्डीकर आणि साईभक्तांसाठी खरेदीची एक उत्तम संधी उपलब्ध करून दिली आहे, अशा शब्दांत त्यांनी परिवाराचे अभिनंदन केले.

मान्यवरांची उपस्थिती – या सोहळ्याप्रसंगी दंडवते परिवाराच्या वतीने सर्व पाहुण्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील



अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी संजीवनी विद्यापीठाचे अध्यक्ष अमित कोल्हे, गणेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे, माजी,व्हाईस चेअरमनविजयराव दंडवते,चेअरमन नारायणराव कार्ले,श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त अविनाश दंडवते,जयराज दंडवते विक्रांत दंडवते, अभिजीत दंडवते, प्रशांत दंडवते, जयदीप दंडवते, निशांत दंडवते यांसह दंडवते परिवार, आप्तेष्ट आणि मित्रपरिवार उपस्थित होता.

# वनिता मानकर यांना 'छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण' पुरस्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यभूमी रायगड गौरव संमेलनात अहिल्यानगर येथील श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना ''छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण'' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.शाल श्रीफळ, स्मृती चिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

याप्रसंगी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले, प्रसिद्ध अभिनेते संतोष पाटील,प्रमुख उपस्थिती

उदय वाघेरे,संमेलनाध्यक्ष रायगड येथील आई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोदराव मोरे,स्वागताध्यक्ष प्रा.डॉ.बी.एन.खरात,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रायगड अध्यक्ष राकेश खराडे,कोकण अध्यक्ष शैलैश पालकर, उद्योजक गणेश मानकर, रणरागिणी महिला फाउंडेशनचे अध्यक्षा रोहिणीताई पवार (अहिल्यानगर),संयोजन समितीचे सौ.श्वेता शिर्के (रायगड),राजश्री कोळी(अलिबाग), संदेश महाडिक (रायगड),प्रा.सोनाली जाधव (शिर्डी) आदी उपस्थित होते.

सौ.वनिता मानकर यांनी श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण बचत गट या माध्यमातून व सामाजिक कार्यात नेहमी सहभाग घेऊन कार्य करत असून सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे.प्रामाणिकपणे,निष्ठेने व सातत्यपूर्ण परिश्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी व मोलाचे आहे.रायगडच्या ऐतिहासिक भूमीत सौ.मानकर यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन छत्रपती शिवराय कर्तृत्व भूषण पुरस्कार २०२६ या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

(पान १ वरून)

## शिंदे सेनेच्या माजी नगरसेवकाकडून नगर शहरातील व्यापाऱ्याला जबर मारहाण

डोक्यात मारत असताना डोके वाचविण्यासाठी त्यांनी उजवा हात मध्ये घातला असता उजव्या हाताच्या पंजास रॉड लागुन जखम झाली. या माराने ते दुचाकीवरून खाली पडले. त्यावेळी कृष्णा खैरे व इतर अनोळखी दोघांनी लोखंडी रॉडने व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावेळी तुला आता जिवंत सोडणार नाही, तू आमच्या पोटावर पाय दयायला निघालास, माझ्या बापाने पण तुला तक्रार मागे घेण्यासाठी समजावले होते असे म्हणत कृष्णा दीपक खैरे याने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने माझ्या डाव्या व उजव्या पायाचे गुडघ्यावर त्याखालील भागावर जोरात मारले. आरडाओरड्याने आसपासचे लोक जमा होत आहेत असे पाहून ते तिघे पळून गेले. मारहाणीमळे जागेवरून उडता येत नसल्याने कुलकर्णी नंतर मुलगा व भावाला फोन करून माहिती दिली. नंतर त्यांना नगरीतील खाजगी हॉस्पिटलमध्ये देण्यात आले. डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## माळीवाडा वेश पाडू नये म्हणून खंडपीठात याचिका दाखल

ॲड. नारायण नरवडे हे बाजू मांडत असून आता न्यायालय काय निर्णय देते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी यांनी जोपर्यंत पुरातत्त्व खात्याचा निर्णय घेत नाही तोपर्यंत सर्व विशेषतः ठेवावे असे पत्र दिले होते तर दुसरीकडे याचिका दाखल करताना कावरे यांनी दिल्लीच्या पुरातत्व विभागाचे काही दाखले सुद्धा या समवेत त्यांनी दिलेले आहे. एकीकडे विकासाच्या नावाखाली ऐतिहासिक वारसा पायदळी तुडवला जात असल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे नागरिकांनी न्यायालयीन लढ्याचा मार्ग स्वीकारल्याने प्रशासनासाठी ही मोठी डोकेदुखी ठरणार आहे. माळीवाडा वेश वाचणार की विकासाच्या नावाखाली इतिहास गडप होणार, याचा फैसला आता न्यायालयच करणार आहे.

## राहुरी व बारामतीसाठी प्रा. शिंदे स्टार प्रचारक

करण्याचे संकेत दिले आहेत. विशेषतः बारामतीसारख्या प्रतिष्ठेच्या लढतीत पक्षाने संपूर्ण ताकदीनिशी झोकून देण्याची रणनीती आखली आहे. राहुरी मतदारसंघातही स्थानिक मुद्द्यांबरोबरच राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांचा प्रचार मोठ्या प्रमाणावर करण्यात येणार आहे. दरम्यान, या पोटनिवडणुकीत कोणता पक्ष बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, येत्या काळात या स्टार प्रचारकांच्या सभांमुळे राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

## भाजप महायुतीच्या उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचार नियोजनाची बैठक

राहू नका. सर्वांना सोबत घेऊन प्रचार यंत्रणा मजबूत करा. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी २५ ते ३० वर्षे नगर तालुका एकसंघ ठेवला. त्यांच्या जनसेवेची परंपरा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा आणि त्यांच्या विकासकामांवर मत मागा. अक्षय कर्डिले यांना आमदार करून त्यांचे स्वप्न पूर्ण करा. या बैठकीत आमदार संग्राम जगताप यांनीही कार्यकर्त्यांना संबोधित करत सांगितले की, ''बारामती व राहुरी पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. स्वर्गीय अजितदादा पवार आणि स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. उमेदवार अक्षय कर्डिले यांनी उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. या बैठकीस बाजार समितीचे माजी सभापती हरिभाऊ कर्डिले, उपसभापती रभाजी सुळ, जिल्हाध्यक्ष दिलीप बालसिंग, अमोल गाडे, रोहिदास कर्डिले, संदीप कर्डिले, जालिंदर कदम, संतोष मस्के, अभिलाष घिगे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सुरुवात उत्साहात

या भव्य कार्यक्रमामुळे संपूर्ण शहर भीममय झाले असून आंबेडकरी समाजासह सर्वच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती सोहळ्याला ऐतिहासिक स्वरूप प्राप्त करून दिले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयंती महोत्सव समितीचे अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, प्रा. जयंत गायकवाड, विलास साठे, शरद मेढे, अंकुश मोहिते, पप्पू पाटील, मुन्ना भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, सतीश शिरसाट, जय कदम, विशाल कांबळे, प्रा डी आर जाधव, सचिन शेलार, सागर ठोकळ, गौरव साळवे गौतमी ताई भिंगारदिवे, येसुदास वाघमारे आदींनी परिश्रम घेतले.